# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.२६ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## प्रल्हाद जोशी यांच्याकडे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची धुरा

**नवी दिल्ली** – केंद्र सरकारमध्ये मोठा बदल करत प्रल्हाद जोशी यांच्याकडे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्यानंतर ही नियुक्ती करण्यात आली. या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, प्रल्हाद जोशी यांच्याकडे आता राष्ट्रीय शिक्षण धोरण, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण तसेच शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या सुधारणांची जबाबदारी असणार आहे.

## गुजरात ते कर्नाटक कमी दाबाचा पट्टा सक्रिय; मुंबई, कोकण अन् कोल्हापूरला यलो अलर्ट

पुणे दि.२५ (प्रतिनिधी)– राज्यात पावसाने पुन्हा एकदा रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. गुजरातपासून ते थेट कर्नाटकपर्यंत निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे महाराष्ट्रातील मान्सून अधिकच सक्रिय झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात पुढील २ ते ३ दिवस पावसाचा जोर पाहायला मिळणार आहे. पुणे आणि साताऱ्यातील घाटमाथा परिसर तसेच संपूर्ण कोकण किनारपट्टीवर अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनचा पट्टा मध्य प्रदेशातील गुना, सिधी येथून थेट ईशान्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय झाला आहे. याशिवाय गुजरात ते कर्नाटक या पट्ट्यात हवेचा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. या दोन प्रमुख हवामान प्रणालींमुळे अरबी समुद्रावरून बाष्पयुक्त वारे राज्याकडे वेगाने खेचले जात आहेत. याचा थेट परिणाम म्हणून महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर वाढल्याचे चित्र आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पावसाचा सर्वात मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील घाट परिसरासाठी अतिमुसळधार पावसाचा विशेष अलर्ट जारी केला आहे.

# झेन जी जिंकले, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

## झुरळांच्या दणक्यापुढे मोदी सरकार झुकले!

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)– नीट पेपरफुटी प्रकरण आणि देशातील ढासळलेली शिक्षण व्यवस्था याला जबाबदार धरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि नीट पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपये आर्थिक मदत द्यावी. मागणीसाठे गेल्या महिनाभरापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनाला आज मोठे यश मिळाले. मोदी सरकार सीजेपीच्या आंदोलनापुढे झुकले आणि अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला.

गेल्या महिनाभरापासून जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू होते. नीट फेपरफ टीप्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, ही मागणी कॉक्रोच जनता पार्टीने लावून धरली होती. या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळाला. २० जुलै रोजी कॉक्रोच जनता पार्टीने संसद भवनावर आयोजित केलेल्या मोर्चात लाखोंच्या संख्येने तरूण सहभागी झाले. या आंदोलक विद्यार्थ्यांवर दिल्ली पोलिसांनी अमानुष लाठीमार केला, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. परंतु त्यानंतर या आंदोलनाला आणखीच धार चढली.

मोदी सरकारने मोर्चाच्या दिवशी चर्चेची कवाडे उघडली, पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. त्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाशी मोदी सरकारची आज तिसऱ्या टप्प्यातील चर्चा हाणार होती. या चर्चेसाठी दुपारी साडेतीनच्या सुमाराची वेळ ठरली होती. ही बैठक होण्यापूर्वीच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला.



धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांचा राजीनामा सोशल मीडियावर शेअर केला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीने जंतर-मंतरवर जल्लोष केला.

नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये देशाचे प्रधानमंत्री झाले. तेव्हापासून धर्मेंद्र प्रधान त्यांच्या मंत्रिमंडळात आहेत. गेल्या १२ वर्षांपासून मोदी सरकारमध्ये त्यांच्याकडे कॅबिनेट मंत्रालयाचा पदभार आहे. त्यांनी विविध खाती सांभाळली आहेत. मोदी सत्तेत आल्यापासून त्यांच्या सरकारमध्ये टिकून राहण्याची किमया केवळ सातच नेत्यांना जमली आहे. त्यात नितीन गडकरी, राजनाथ सिंह निर्मला सीतारामन, पीयूष गोयल, किरण रिरिजू, गिरीराज सिंह आणि धर्मेंद्र प्रधान या सात नेत्यांचा समावेश आहे. आरएसएसचा भक्कम पाठिंबा असूनही कॉक्रोच जनता पार्टीच्या दणक्यामुळे आता नॉटआऊट सातच्या यादीतून धर्मेंद्र प्रधान डिलिट झाले आहे.

कॉक्रोच जनता पार्टीचे जंतर-मंतरवर ३६ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे राजीनामा देणे भाग पडलेले धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देताना मात्र देशातील विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि करिअर महत्वाचे असल्याची जाणीव झाली आहे. प्रधान यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पत्र लिहून प्रधानमंत्री मोदींकडे आपला राजीनामा सोपवला.

गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून मी विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षण सुधारणांसाठी समर्पित राहिलो आहे. भारतातील युवा पिढीच्या स्वप्नांना साकार करणे हा आमच्या राजकीय व सामाजिक जीवनाचा नैतिक संकल्प राहिला आहे, असे प्रधान यांनी या पत्रात म्हटले आहे. जंतर-मंतर आणि देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा राष्ट्रविरोधी शक्तींनी गैरफायदा घेऊ नये. देशातील एकाही विद्यार्थ्याचे भविष्य कायदेशीर अडचणीत सापडू नये आणि आपल्या मुलांनी कोर्ट-कचेऱ्यांमध्ये वेळ न घालवता अभ्यासावर व स्वतःचे करिअर घडवण्यावर लक्ष केंद्रित करावे, याच विचाराने मी माझा राजीनामा प्रधानमंत्र्यांकडे सोपवत आहे.

### आपण करून दाखवल – अभिजीत दिपके

आपण करून दाखवलं, असे म्हणत अभिजीत दिपके आणि आंदोलकांना तुफान जल्लोष केला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. हे कायम म्हणत होते की, या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत. पण आपण करून दाखवलं. घाबरायचे नाही. लोकशाही आहे. लोकशाहीत बोलायची भीती वाटत असेल तर मग ती कसली लोकशाही? आवाज उठवला तरच हे लोक लाईनमध्ये राहतील. यांना लाईनमध्ये ठेवणे आवश्यक आहे. वरती बादशहा समजून बसलेले लोक आमच्यामुळे तिथे बसले आहेत. राजीनामा तर झाला पण आम्ही सारे असे जाणार नाहीत. आमच्या आणखी दोन मागण्या आहेत. नीट परीक्षेतील गैरप्रकारामुळे आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ कोटी रुपये नुकसासन भरपाई द्यावी आणि २० जुलै रोजी आंदोलकांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई या दोन मागण्या आहेत, असे अभिजीत दिपके यांनी आंदोलकांशी बोलताना सांगितले.

## कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन मागे; जंतरमंतरहून माघारी फिरण्याचे तरुणाईला आवाहन!



नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था) शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर इतरही दोन मागण्या मान्य केल्याने कॉक्रोच जनता पार्टीकडून आंदोलन मागे घेण्याची घोषणा करण्यात आली आहे. सरकारसोबत पार पडलेल्या तिसऱ्या बैठकीनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत याबाबत माहिती देण्यात आली. केंद्र सरकारकडून जे. पी. नड्डा, जितेंद्र सिंह आणि कॉक्रोच जनता पार्टीकडून राष्ट्रीय प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी चर्चेत सहभाग घेतला होता. सरकारने आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यास तसेच, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरभाई देण्याचे मान्य केल्याचे दास यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

नीट पेपरफुटीप्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीकडून गेल्या ३६ दिवसांपासून दिल्लीत जंतर मंतरवर आंदोलन केले जात होते. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी या आंदोलनाला समर्थन देत उपोषणाची घोषणा केल्यानंतर याला वेगळी धार चढली. प्रधान यांच्या राजीनाम्याची प्रमुख मागणीपुढे अखेर सरकार झुकलं आणि आज प्रधान यांनी शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिला. यानंतर कॉक्रोच जनता पार्टीचे शिष्टमंडळ आणि केंद्र सरकारच्या मंत्र्यांसोबत तिसरी बैठक पार

पडली. या बैठीत सीजेपीकडून इतर दोन मागण्याही ठेवण्यात आल्या. या मागण्या सरकारने मान्य केल्याचे संयुक्त पत्रकार परिषदेतून जाहीर करण्यात आले.

आंदोलनादरम्यान केवळ दिल्लीतच नव्हे तर भाजपाशासित राज्यात आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे (पान ४ वर)

## देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा विजय–शरद पवार

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)– नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीत सुरू असलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला मोठं यश आलं आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी आज (२५ जुलै) अखेर शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीकडून एका महिन्यापासून दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन सुरू होतं. या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळाला होता. अनेक दिग्गज नेत्यांनी या आंदोलनस्थळी जाऊन भेटी देत केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली होती.

या सर्व घडामोडीनंतर अखेर आज धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता देशभरातील अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. 'देशातील युवा शक्तीच्या एकजुटीचा हा विजय आहे', अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली आहे. दरम्यान, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शरद पवार यांनी आज पत्रकार परिषद घेत पंतप्रधान मोदींच्या भेटीबाबत मोठा खुलासा केला आहे.

''नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीत जंतर-मंतरवर सलग २८ दिवस तरुणाईने दिलेला लढा आणि दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे. आंदोलकांच्या आग्रही मागणीनुसार आज अखेर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला. दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणारा हा लढा लोकशाहीच्या ताकदीचं प्रतीक आहे. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. तसंच, विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी ज्या पद्धतीने देशातील युवकांना नैतिक आणि संसदीय पाठबळ दिलं, त्याबद्दल विरोधी पक्षातील सर्व खासदारांचे मनःपूर्वक आभार. देशातील लोकशाहीने कात टाकली आहे, आणि त्याचं श्रेय देशातील युवा पिढीला जातं हे निश्चितपणे नमूद करावसं वाटतं'', अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली आहे.

## त्यांनी वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिले, धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्यावर मुख्यमंत्री फडणवीसांची प्रतिक्रिया

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)– नीट पेपरफुटीच्या प्रकरणानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने दिल्लीत एका महिन्यापासून आंदोलन सुरू करण्यात आलं होतं. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला आता मोठं यश आलं आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी आज (२५ जुलै) शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीकडून हे आंदोलन सुरू करण्यात आलं होतं. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळाला होता. यानंतर आज धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला.

धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. या घडामोडींवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील पोस्ट शेअर करत प्रतिक्रिया दिली. 'धर्मेंद्र प्रधान यांनी वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिलं, हेच एका खऱ्या भाजपा कार्यकर्त्याचं वैशिष्ट्य आहे', असं मुख्यमंत्री फडणवीसांनी म्हटलं आहे.

''धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण सुधारणांची अंमलबजावणी केली. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' लागू करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. 'पीएम श्री' (पान ४ वर)

## धर्मेंद प्रधानांचा राजीनामा शिक्षणव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल–राहुल गांधी

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)– शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील विद्यार्थी, तरुणांचे आभार मानले आहेत. राहुल गांधी यांनी या घडामोडीवर भाष्य करताना, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हे देशाच्या शिक्षणव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे आणि सांकेतिक पाऊल असल्याचे म्हटले आहे. यासोबतच त्यांनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी देशातील संस्थांवर कब्जा मिळवू पाहणाऱ्या आणि संविधान नष्ट करू पाहणाऱ्या राजवटीविरुद्ध एकत्र लढण्याचे आवाहन केले.

राहुल गांधी यांनी रस्त्यावर उतरून आपल्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या तरुणांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले: ''ज्या विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी रस्त्यावर उतरून लोकशाहीसाठी लढा दिला, देशाच्या भविष्यासाठी संघर्ष केला आणि आपल्या संविधानाचे रक्षण केले, त्या प्रत्येकाचे मी अभिनंदन करतो. मला तुमचा अत्यंत अभिमान वाटतो.'' हा केवळ विद्यार्थ्यांचा विजय नसून अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकासाठी शेतकरी, कामगार आणि पीडितांसाठी एक मोठा संदेश आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. अन्यायासमोर न झुकता उभे राहणे हेच खरे धैर्य आणि बुद्धिमत्ता असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हे फक्त एक पाऊल असल्याचे सांगत राहुल गांधी यांनी सरकारला त्यांच्या उर्वरित दोन प्रमुख मागण्यांची आठवण करून दिली. ते म्हणाले, ज्यांनी विद्यार्थ्यांवर अन्याय केला, त्यांच्यावर मारहाण किंवा गोळीबार केला, त्या सर्वांना जबाबदार धरले पाहिजे. या हिंसाचाराचे आयोजन करणाऱ्यांपासून ते त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांपर्यंत प्रत्येकाला कठोर शिक्षा झालीच पाहिजे. देशाच्या पंतप्रधानांनी भारतातील विद्यार्थ्यांचा आणि देशाच्या भविष्याचा आदर राखत, ज्या विद्यार्थ्यांची फसवणूक झाली आणि ज्यांच्यावर हल्ले झाले, त्यांची जाहीरपणे माफी मागितली पाहिजे, असेही ते म्हणाले.

## देशातली ९५% जनता मोदी सरकारच्या विरोधात; भागवतांच्या सल्ल्यामागे तरुणांचा वाढता असंतोष–विजय वडेट्टीवार

मुंबई दि.२५ (वृत्तसंस्था)– देशातली ९५ % जनता मोदी सरकारच्या विरोधात आहे. मोहन भागवत यांच्या सल्ल्यामागचे कारण तरुणांचा वाढता असंतोष. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना स्वतःचा बचाव करण्यासाठी व्हिडिओ पोस्ट करण्याची वेळ आली आहे. आजपर्यंत कोणत्याही पंतप्रधानांना स्वतःचा बचाव करण्यासाठी अशा पद्धतीने व्हिडिओ प्रसिद्ध करण्याची वेळ आली नव्हती, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

वडेट्टीवार म्हणाले की, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या व्हिडिओला मिळालेल्या शेकडो मिलियन रीचचा मोठा गाजावाजा केला जात आहे. पण ही रीच जनतेच्या प्रेमाची नसून भाजपच्या आयटी सेलच्या भाड्याच्या टट्टूंनी निर्माण केलेली कृत्रिम हवा आहे, असा टोलाही त्यांनी हाणला.

वडेट्टीवार यांनी मीडियाशी संवाद साधला. तसेच सोशल मीडियावर पोस्ट करून प्रखर शब्दांत टीका केली. वडेट्टीवार म्हणाले की, आज सोशल मीडियावर नजर टाकली तर ९५ टक्के लोक नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारच्या विरोधात बोलताना दिसत आहेत. बेरोजगारी, पेपर लीक, महागाई आणि तरुणांच्या भविष्याच्या प्रश्नांवर देशभरातून संताप व्यक्त होत आहे. आजपर्यंत कोणत्याही पंतप्रधानांच्या प्रतिमेवर सोशल मीडियावर एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रश्नचिन्ह उपस्थित झाले नव्हते, जितके आज नरेंद्र मोदींच्या प्रतिमेबाबत उपस्थित होत आहेत.

त्यामुळेच भाड्याच्या टट्टूंमार्फत वातावरण बदलण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण प्रचाराने वास्तव बदलत नाही. देशातील तरुण आता जागा झाला आहे. ज्या तरुणांच्या विश्वासावर सत्ता मिळाली, तोच तरुण लोकशाहीच्या (पान ४ वर)

## टीईटी पेपरफुटी प्रकरणी फरार मुख्य आरोपी बिजेंद्र गुप्ताला बिहारमधून अटक

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)– टीईटीच्या पेपरफुटी प्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. टीईटी पेपर फुटी प्रकरणातील मुख्य आरोपीला बिहारमधून अटक करण्यात आली आहे. बीजेंदर कुमार गुप्ता असं या आरोपीच नाव असून त्याला बिहारमधून पोलिसांनी अटक केली आहे.

दरम्यान, या मुख्यसूत्रधार आरोपीला पोलिसांनी बिहारमधून मुंबई आणि नंतर भिवंडी येथे आणण्यात येत आहे. या प्रकरणी आतापर्यंत या १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर याआधी १२ आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई करत यातील फरार मुख्य आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीजेंदर कुमार गुप्ता हा पेपर फुटी प्रकरणातला मुख्य आरोपी होता. विजेंदर कुमार गुप्ता याने साथीदार सोनूसह मिळून छापखान्यातील कर्मचाऱ्यांना पैसे व प्रॉपर्टीचे आमिष दाखवून पेपर मिळवले. छापखान्यातून बुटात लपून पेपर बाहेर काढण्यात आले होते. दरम्यान, हे पेपर अवघ्या आठ हजार रुपयांमध्ये मिळवण्यात आले होते.व हे पेपर विक्री करण्यासाठी महाराष्ट्रातील भिवंडीत व पुण्यात आणले होते. तब्बल दीड कोटीमध्ये या पेपरची विक्री होणार होती. परंतु भिवंडी पोलीस ग्राहक बनून भिवंडीत टीईटी पेपर विक्रीचा पर्दाफाश केलाय.

भिवंडीच्या कोनगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक २८१/२०२६ मधील फरार असलेल्या आरोपींला ठाणे शहर आयुक्तालयातील भिवंडी पोलिसांनी बिहारमधील पटना येथे अत्यंत नियोजनबद्ध व धाडसी कारवाई करत ताब्यात घेतले. या कारवाईमुळे परीक्षा गैरप्रकार प्रकरणाच्या तपासाला मोठे यश मिळाले आहे. सदर गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(५), ६१(२) तसेच महाराष्ट्र विद्यापीठ व इतर विनिर्दिष्ट परीक्षा (अनुचित साधनांच्या वापरास प्रतिबंध) अधिनियम, १९८२ मधील कलम ६ व ८ आणि सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांची प्रतिबंधक उपाययोजना) अधिनियम, २०२४ मधील कलम ११(१), ११(२), ११(३), १२(१) व १२(२) अन्वये नोंदविण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील मुख्य आरोपी बिजेंद्र कुमार बालेश्वर शहा (वय ४३) व त्याचा साथीदार हे फरार होते. त्यांचा शोध घेण्यासाठी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील पोलिसांनी सातत्याने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि विविध राज्यांतील समन्वयाच्या आधारे शोधमोहीम राबवली. अखेर बिहार राज्यातील पटना येथे अत्यंत फिल्मी आणि धाडसी पद्धतीने दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात यश आले. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील, भिवंडी पोलीस यांच्या ह्या उल्लेखनीय कारवाई करिता राज्य व देशभरातून कौतुक केले जात आहे.

## देशातली युवाशक्ती जर एकत्र आली तर काय करु शकते याची झलक, मुंबईत उद्याचा मोर्चा निघणारच–उद्धव ठाकरे

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)– शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपवला आहे. – परीक्षेत झालेल्या गोंधळावरून देशभरात सुरू असलेला विवाद आणि जंतर-मंतर येथील विद्यार्थ्यांचे आंदोलन या पार्श्वभूमीवर त्यांनी हा निर्णय घेतला आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडियावर याची घोषणा करत राजीनामा देण्यामागील कारणही स्पष्ट केले आहे. तर प्रधान यांच्या राजीनाम्यावरती शिवसेना ठाकरे गटाची आणि मनसेची संयुक्तपणे पत्रकार परिषद घेण्यात येत आहे. यावेळी पत्रकार परिषदेवेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, गेले काही दिवस आपला देश अस्वस्थ आहे, याचे कारण आपल्याला सगळ्यांना माहीत आहे. अभिजीत दिपके आणि सगळ्या तरुणांचे आणि पालकांचे अभिनंदन. हा विषय फक्त राजीनाम पर्यंत नव्हता. गेले १२ वर्ष रोज काही तरी सुरू होते. नोटबंदी असेल किंवा काही. देशात जनता राहिली नाही असे हे लोक वागत आहे. हे सगळे झुरळ आहे असे सरकार बघत होते. मला डायलॉग आठवला एक मच्छर आदमी को.. तसे एक झुरळाने देश झुकविला. मी अभिनीत दिपकेचं ट्वीट पाहिले की, हे आंदोलन मागे घेतले नाही. महत्त्वाची मागणी होती ती राजीनाम्याची...आता राजीनामा दिला आहे की, खाते बदल झाला आहे हे स्पष्ट नाही. आता हे झाले त्याच्या पुढे काय? असा सवालही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

तर ज्या तरुणाला झुरळ म्हटलं त्यांनी सुद्धा लक्षात ठेवलं पाहिजे की, आपण केवळ खुर्चीत बसलोय म्हणून डोक्यात माज आलाय असं वागू नका. देशातली युवाशक्ती ही जर का एकत्र आली तर काय करू शकते, त्याची ही झलक आहे. मी आपल्यासमोर किंवा आम्ही सगळे आपल्यासमोर येण्यापूर्वी अभिजीत दीपकेचं एक ट्वीट पाहिलं आणि त्यांनी सांगितलं की आंदोलन अजूनही आम्ही मागे घेतलेलं नाही, कारण अजून दोन मागण्या त्यांच्या बाकी आहेत. महत्त्वाची मागणी होती ती धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची. आता त्यांनी राजीनामा दिलाय का त्यांचा खातेबदल केलाय याच्यावरती अजून काही स्पष्टता नाही, पण त्यांनी राजीनाम्याचं पत्र हे सर्व माध्यमांसमोर (पान ४ वर)

## पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करुन पूर्ण करणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

पंढरपूर दि.२५ (प्रतिनिधी)– श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक



प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, ''पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. (पान ४ वर)

## नाशिकमध्ये भूकंपाचे सलग चार धक्के; सुरगाणा, दिंडोरीत नागरिकांमध्ये घबराट

नाशिक दि.२५ (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात अनेक गावांमध्ये शनिवारी दिवसभर भूकंपाचे धक्के जाणवल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. किमान दोन ते कमाल तीन रिश्टर स्केल तीव्रतेच्या धक्क्यांची नोंद झाली. दिंडोरी तालुक्यातील काही भागातही भूकंपाचे धक्के जाणवले. या घटनेत कोणतीही हानी झालेली नसून, नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सुरगाणा तालुक्यातील बोरगाव, वांझुळपाडा, हरणटेकडी, रोटी, मोहपाडा तसेच आसपासच्या भागात सकाळी दहा वाजेच्या सुमारास पहिला धक्का जाणवला. त्यानंतर दुपारपर्यंत कमी-अधिक तीव्रतेचे धक्के जाणवल्याने ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली. महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन केंद्र (मेरी) यांनी शनिवारी सकाळी १० ते दुपारी १२.१० या कालावधीत एकूण चार धक्क्यांची नोंद झाल्याचे म्हटले आहे. नाशिकपासून ४५ किलोमीटर अंतरावर या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. त्याची तीव्रता अनुक्रमे ३, २.२, २ आणि २.२ रिश्टर स्केल इतकी नोंदली गेली.

दिंडोरी तालुक्यातील भनवड येथेही दोन सौम्य धक्के जाणवले. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासनाने स्थानिक यंत्रणेमार्फत घटनास्थळी पाहणी सुरू केली. संबंधित गावांमध्ये कोणतीही हानी झालेली नाही. भूकंपमापन यंत्रणा (मेरी) आणि संबंधित तज्ज्ञांकडून सद्यस्थितीचे सातत्याने विश्लेषण केले जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान, सुरगाणा, कळवण तालुक्यातील दळवट तसेच पेठ या आदिवासी भागांत मागील काही वर्षांपासून अधूनमधून भूगर्भातील घडामोडी जाणवत असल्याचे सांगितले जाते.

## विठुरायाची शासकीय महापूजा सुरु असतानाच सीआरपीएफ जवानाची स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या

सोलापूर दि.२५ (प्रतिनिधी)– आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण पंढरपूर नगरी भक्तीरसात तल्लीन झाली असतानाच, वारकरी आणि भाविकांच्या सुरक्षेसाठी बंदोबस्तावर तैनात असलेल्या राज्य राखीव पोलिस दलातील एका जवानाने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक व दुर्दैवी घटना उघडकीस आली असून. या अनपेक्षित प्रकारामुळे पंढरपूरसह संपूर्ण पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

जीवन संपवणाऱ्या ३० वर्षीय एसआरपीएफ जवानाचे नाव रामेश्वर ध्रुपद साबणे असून ते मूळचे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील रहिवासी होते. आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास, ज्यावेळी मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा सुरू होती, नेमक्या त्याच वेळी त्यांनी स्वतःच्या सर्व्हिस रायफलमधून गोळी झाडून घेत हे टोकाचे पाऊल उचलले. गोळीबाराचा आवाज ऐकताच परिसरात तैनात असलेल्या इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र गंभीर दुखापत झाल्यामुळे रामेश्वर साबणे यांचा जागीच मृत्यू झाला होता. त्यांनी ऐन आषाढी एकादशीच्या दिवशी हे टोकाचे पाऊल नेमके का उचलले, याचे ठोस कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नसून पोलिस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# मराठवाड्यात रेल्वे क्रांतीची नांदी


मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला आता नवी गती मिळणार आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या महत्त्वाकांक्षी २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली असून, या प्रकल्पामुळे मागासलेल्या रेल्वे सुविधांना मोठा बूस्टर मिळण्याची अपेक्षा आहे. मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे.

रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदू बनू शकतो.

जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे. दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे.मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गासोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे.राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे.

# !!! प्रा.वसंत बापट:अस्सल रसिकता आणि अतींद्रिय प्रतिमासृष्टी !!!

**संस्कृतातील अभिजातता आणि नादवती शब्दकळा; बंगालीतील, विशेषत: गुरुदेव टागोरांच्या कवितेतील-मानवतावाद आणि इंग्रजी कवितेतील स्वच्छंदवादी प्रवृत्ती ह्यांचे ठळक संस्कार बापटांच्या कवितेत झालेले दिसतात. बापटांची अस्सल रसिकता आणि अतींद्रिय प्रतिमासृष्टी हेही त्यांच्या कवितेचे विशेष लक्षणीय पैलू होत. संग्रही ठेवण्याजोगी महत्त्वपूर्ण माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या या लेखात शोधा... संपादक.**



प्रा.वसंत बापट यांचा जन्म दि.२५ जुलै १९२२ रोजी सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथे झाला. तर महाविद्यालयीन शिक्षण सन १९४८मध्ये पुण्याच्या स.प.महाविद्यालयात झाले. त्यानंतर ते मुंबईतील नॅशनल कॉलेज आणि रामनारायण रुईया कॉलेज या महाविद्यालयांतून मराठी आणि संस्कृत विषयांचे प्राध्यापक होते. सन १९७४पासून मुंबई विद्यापीठातील गुरुदेव टागोर अध्यासनाचे ते प्राध्यापक होते, साहित्य अकादमीचे सदस्यही होते. प्रा.बापट हे स्वातंत्र्य चळवळीतही सहभागी झाले होते. सन १९४२च्या चले जाव चळवळीत त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, ऑगस्ट १९४३ ते जानेवारी १९४५ पर्यंत ते तुरूंगात होते. सन १९४७ ते १९८२पर्यंत ते मुंबई विद्यापीठात प्राध्यापक होते. सन १९८३ ते १९८८पर्यंत ते सा.साधनाचे संपादक होते. राष्ट्रसेवा दलाशी ते संलग्न होते. सन १९७२ साली मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. संस्कृतातील अभिजातता आणि नादवती शब्दकळा; बंगालीतील, विशेषत: गुरुदेव टागोरांच्या कवितेतील-मानवतावाद आणि इंग्रजी कवितेतील स्वच्छंदवादी प्रवृत्ती यांचे ठळक संस्कार बापटांच्या कवितेत झालेले दिसतात. बापटांची अस्सल रसिकता आणि अतींद्रिय प्रतिमासृष्टी हेही त्यांच्या कवितेचे विशेष लक्षणीय पैलू होत. बारा गावचे पाणी-१९६७ हा बापटांचा प्रवासवर्णनपर ग्रंथ. बापटांच्या रसिक मनाने भारताचा निसर्ग, चालिरीती, लोककला, देशानिक प्रगतीच्या दिशेने होत असलेली त्याची वाटचाल यांचे जे दर्शन घडले, त्याचे प्रत्ययकारी चित्रण या ग्रंथात त्यांनी केले आहे.

लहानपणापासून बापटांवर राष्ट्र सेवा दलाचे आणि साने गुरुजींच्या सहवासाचे संस्कार झाले. बिजली-१९५२ या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहावर या संस्कारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. अकरावी दिशा-१९६२, सकीना-१९७२ आणि मानसी-१९७७, या त्यांच्या बिजलीनंतरच्या काव्यसंग्रहातून त्यांच्या अनुभवांचे क्षेत्रही उत्तरोत्तर अधिकाधिक विस्तारत गेल्याचे दिसते. संस्कृत, बंगाली आणि इंग्रजी कवितेचा प्रभावही या कवितेवर दिसून येतो. सामाजिक विषमता आणि अन्याय यांच्या तीव्र जाणिवे बरोबरच यौवनाचा अभिजात डौल, निसर्गाच्या विभ्रम-विलांसाहून खट्याळ शृंगार व्यक्तविण्याची प्रवृत्ती, लावणीसारख्या जुन्या काव्यप्रकाराचे पुनरुज्जीवन करण्याचा रसिक प्रयत्न यांचा प्रत्यय त्यांच्या बिजलीनंतरच्या कवितेत येतो. त्यांच्या कवितेचे परिपक्व रुप मानसीमध्ये विशेषत्वाने जाणवते. या काव्यसंग्रहातील त्यांची कविता मितभाषी; परंतु आशयदृष्ट्या अधिक गहन अशी आहे.

जनजागृति करणे हेही कवितेचे एक महत्त्वाचे कार्य आहे, असे बापट मानत असल्यामुळे राष्ट्रीय संकटाच्या, दुःखाच्या वा देशातील विविध जन-आंदोलनांच्या प्रसंगी त्यांनी आपली संवेदनशील प्रतिक्रिया आपल्या कवितेतून व्यक्तविली आहे. ‘उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू‘ ही त्यांची गाजलेली कविता किंवा त्यांनी रचिलेला संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा ही त्याची काही उल्लेखनीय उदाहरणे होत. गांधींची जीवनयात्रा-१९४८, नव्या युगाचे पोवाडे-भाग १ ते ३, सैन्य चालले पुढे-१९६५, या त्यांच्या रचनाही या संदर्भात निर्देशनीय आहेत. चंगामंगा, अबडक तबडक, आम्ही, गरगर गिरकी, फिरकी, फुलराणीच्या कविता, परीच्या राज्यात या त्यांनी लिहीलेल्या बालकविता. सेतु या काव्यसंग्रहास व लहान मुलांसाठी त्यांनी लिहिलेल्या बाल- गोविंद-१९६५ या नाटकास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला. साहित्याभ्यास-१९८१ हा त्यांचा अगदी अलिकडील ग्रंथ. संगीत, अभिनय, लोककला. यांची उत्तम जाण बापटांच्या ठायी आहे. राष्ट्रसेवा दलातर्फे त्यांनी सादर केलेल्या महाराष्ट्र दर्शन, भारत दर्शन यांसारख्या यशस्वी कार्यक्रमातून तिचा प्रत्यय येतो.

त्यांच्या एका काव्यसंग्रहाला साहित्य पुरस्कार मिळाला आहे. बिजली, सेतू, अकरावी दिशा, सकिना, मानसी, शिंग फुंकिले रणी, शूर मर्दाना पोवाडा, तेजसी, राजसी, प्रवासाच्या कविता आदी प्रसिद्ध आहेत. बारा गावचं पाणी हे प्रवासचित्र, जिंकुनि मरणाला हे व्यक्तिदर्शन, तोलनिक साहित्याभ्यास ही समीक्षा, तर विसाजीपंताची बखर ही राजकीय उपहास प्रसिद्ध आहेत. वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा करंदीकर यांच्या संयुक्त काव्यदर्शनाचे अर्ध शतकाहून अधिक काळ देशभरात कार्यक्रम झाले. सन १९६९मध्ये त्यांनी युगोस्लोव्हियातील आंतरराष्ट्रीय कविसंमेलनात भारताचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. सन १९७७ आणि १९९३मध्ये आखाती देशात त्यांच्या काव्यदर्शनाचे कार्यक्रम झाले. सामाजिक, वाङमयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक विषयांवर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर त्यांची व्याख्याने झाली. साहित्य अकादमीच्या कार्यकारिणीवर ते १० वर्षे होते. याशिवाय इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन्स दिल्ली या संस्थेचे ते अनेक वर्षे सदस्य होते. अशा या बावनकशी साहित्यिकाचे दि.१७ सप्टेंबर २००२ रोजी दुःखद निधन झाले. विलिध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!! प्रा.वसंत बापट यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन जी !!

– संकलन व सुलेखन –

**श्री कृष्णकुमार आनंदी-**
**गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

# बदलतं बीड ; रेल्वेचं स्वप्नः!

**बीड जिल्ह्याच्या विकासाबाबत दिवंगत मुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महत्तपुर्ण निर्णय घेतले व सध्याच्या उपमुख्यमंत्री व दादांच्या सुविद्य पत्नी हे काम पुढे नेत आहे. बीडच्या आगामी काळातील विकासाबाबत ही विशेष लेखमाला देत आहोत.**

जिल्ह्यात विकास करण्यासाठी शासन स्तरावर विविध निर्णय घेतले जातात. नियोजन, धोरणं यानुसार निधी देणं शासनाचं काम आहे आणि त्यावर प्रत्यक्ष अंमलबजाणी करण्याचं काम जिल्हा प्रशासन आणि विविध विभाग तसेच यंत्रणा यांचं असतं.

बीड जिल्हा हा मुख्यत्वे कृषीप्रधान जिल्हा. येथे मोठे उद्योग नाहीत त्यामुळे युवकांच्या हाताला रोजगार मिळणं कठीण आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने घेतलेले निर्णय आणि त्याची अंमलबजावणी यामुळे बीड जिल्ह्याचं चित्र आता झपाट्याने बदलत आहे.

जिल्ह्यात संपर्क अर्थात दळणवळण साधनांची कमतरताही खूप मोठी समस्या होती. त्यात आता धुळे - सोलापूर महामार्ग झाल्याने खूप मोठा बदल झाला आहे. विभागीय मुख्यालय असणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथे जाण्यासाठी पूर्वी लागणारा ३ ते ३.३० तासांचा कालावधी हा या महामार्गामुळे २ तासांवर आलाय.

दुसऱ्या बाजूला जिल्ह्याचा अधिक संपर्क नजिकच्या अहिल्यानगर जिल्ह्याशी आहे आणि व्यापार देखील याच दिशेने होतो. या दोन्ही मार्गांच्या प्रगतीने आता शंतकऱ्यांना बाजारपेठ जवळ आली आहे.

रेल्वेचं स्वप्न साकार

गेल्या तीन पीढ्या रेल्वे बीडमध्ये यावी हे स्वप्न बाळगून होत्या. दिवंगत मुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांनी ज्यावेळी जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची सुत्रं हाती घेतली त्यावेळी त्यांनी या कामाला गती दिली. आज अजिदादांच्या दुरदृष्टीतून बीड अमुलाग्र बदलतांना दिसेल आणि याला दादांच्या सुविद्य पत्नी सुनेत्राताई पवार यांनी पुढे नेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

दादांच्या उपस्थितीत बीडकरांचं रेल्वेचं स्वप्न पूर्ण झालं. अहिल्यानगर बीड रेल्वे मार्गाचं काम पूर्ण झालं आणि रेल्वे बीडला पोहोचली. आता याचा पुढील टप्पा बीड- परळी रेल्वेमार्गाचा आहे. या कामाला गती देण्यात आली असून याचा दैनंदिन पातळीवर आढावा आणि पाठपुरावा होत आहे.

रेल्वे मार्ग उभारणी यासाठी केंद्र आणि राज्य असा संयुक्त प्रकल्प असल्यामुळे समन्वयाचा भाग खूप मोठा असतो तो समन्वय राखून जिल्हा प्रशासनाने बीड ते वडवणीचे काम पूर्ण करून घेतले आहे.आणि यामार्गावर जलदगती रेल्वे चाचणी देखील पूर्ण झाली आहे. वडवणी ते परळी या उर्वरित टप्यामनचे कामही वेगात सुरू असून २० पैकी १२ गावांची भूसंपादन प्रक्रिया अंतिम निवाडा टप्यामनवर आहे व ८ गावांची कामे प्रारूप आराखडा स्थितीत आहे. याला गती देण्यात आली आहे. या मार्गाचे काम पूर्ण होण्यापूर्वी बीड ते मुंबई रेल्वे सुरू करण्याबाबतही समन्वय सुरू आहे. त्यामुळे बीडच्या विकासाचा महत्वाीचा टप्पा पूर्ण होईल. बीड आता रेल्वे मार्गानेही देशात जोडले गेल्याने आगामी काळात बीडच्या विकासाची गती निश्चितच वाढेल असेच चित्र आहे.

**– प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६

# सोयगाव येथे मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; २ हजार नागरिकांनी घेतला लाभ

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच समर्पण फाउंडेशन यांच्या समन्वयाने दि. २२ जुलै २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, सोयगाव, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख मा. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर मोठ्या प्रमाणावर मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून हे शिबिर संपन्न झाले.

शिबिरामध्ये मेडिसिन, जनरल सर्जरी, कर्करोग, हृदयरोग, नेत्ररोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, कान-नाक-घसा, दंतरोग, बालरोग आदी विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत तपासणी करून उपचार व मार्गदर्शन केले. गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना पुढील उपचारासाठी संबंधित तज्ज्ञ रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात आले.

या शिबिराचा एकूण २,००० रुग्णांनी लाभ घेतला, तसेच ६०० चष्म्यांचे आणि ५६८ चालण्याच्या काठ्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

याशिवाय ५०० आय ड्रॉप्स, ११२ रक्त तपासण्या आणि ८६ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या.

या शिबिरामध्ये ग्रामीण रुग्णालय, सोयगाव, रूबी स्टार रुग्णालय, जामनेर, शासकीय कर्करोग रुग्णालय, मराठवाडा कॅन्सर रुग्णालय, जे. जे. प्लस रुग्णालय, ओरियन सिटिकेअर रुग्णालय, सेंचुरी रुग्णालय, सेठ नंदलाल धूत रुग्णालय, डॉ. हेडगेवार रुग्णालय, कर्णावत कर्करोग रुग्णालय तसेच संतपुरे रुग्णालय (छत्रपती संभाजीनगर) यांनी सहभाग नोंदवून आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली.

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला सोयगाव व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अशा जनकल्याणकारी उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध होण्यास मोठी मदत होत असून, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून राज्यभर अशा शिबिरांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समर्पण फाउंडेशनची टीम, ग्रामीण रुग्णालय सोयगावचे अधीक्षक डॉ. दिनाजी खंदारे, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे डॉ. पुष्कर महाजन, डॉ. रुपाली रिंधे, डॉ. बालाजी गोरे तसेच सहभागी रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महात्म्य आषाढी एकादशीचे

भारतीय संस्कृतीत सण व उत्सवाना महत्वाचे स्थान आहे.या सण उत्सवातून भारतीय नागरिकांना एक प्रकारे चैतन्य व उत्साह प्राप्त होतो. सण व उत्सवात सहभागी होणारे सर्वच प्रचंड उत्साही व आनंदी असतात. असाच आषाढी महिन्यातील अत्यन्त उत्साहाचा व गावकरी,वारकरी,यांना प्रचंड उत्साह ऊर्जा देणारा उत्सव म्हणजे आषाढी एकादशी उत्सव होय. या आषाढी एकादशी दिनी विठ्ठलाच्या पंढरपुरात संपूर्ण राज्यातुनच नव्हे तर देशाच्या विविध भागातून भक्त-भाविक पंढरपूरात विठ्ठलाच्या दर्शनाला येतात.पंढरपूरचा विठ्ठल म्हणजे साक्षात भगवान विष्णू चे अवतार होय. भागवान विष्णू म्हणजे भूतलावरील सर्व सजीवांचे पालनकर्ते होत.विठ्ठलाच्या दर्शनाला राज्यातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून पायी पालख्या ,वारकरी, भक्त -भाविक एक महिना आधीपासूनच निघून आषाढीच्या उत्सवात सहभागी होतात.हे सर्व भक्त भाविक विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक हिउन५ आपल्या जीवनातिल व्यथा, समस्या, अडचणी विठ्ठला समोर मांडतात व आमच्या सह विश्वातिल मानव जातीच्या सुख, समृद्धी व निरोगी जीवन ठेवण्यासाठी प्रार्थना करतात. आषाढी एकादशी दिनी पंढरपूरात देशातील भक्त भाविकांची मोठी यात्राच भरते. विठ्ठल!विठ्ठल !!म्हणत

हे भक्त पंढरपूर नगरी विठ्ठल नामाने दुमदुमून टाकतात.चंद्रभागा नदीच्या वालुकामय जागेवर हे सर्व भक्त भाविक विठ्ठलाच्या चिंतनात रमून जातात. पांडुरंगाला अनाथाचा नाथ ही मानतात. चांद्रभागा नदीच्या काठावर रमून -गमून जाणाऱ्या या या वारकरी मंडळीच्या दृष्टीने आषाढी एकादशी एक अनोखा भक्तिमय सोहळा असतो.पंढरपूरात जमलेली ही वारकरी भक्त भाविक म्हणजे एक मोठा भक्त परिवाराच होय.आषाढी एकादशी म्हणजे स्नेह,आपुलकी, प्रेम,सहकार्य, आपलेपणा या सर्व बाबींचा सुरेख संगम होय.

स्नेह,आपुलकी, प्रेम,सहकार्य, आपलेपणा या सर्व बाबींचा सुरेख संगम होय. आषाढी एकादशी म्हणजे सत्संग सोहळा होय.ज्या सोहळ्यात सुसंगत, सदविचार, सदभाव,सत संग, सद्गुणांचा मिलाप दिसून येतो तो सोहळा होय.या सत्संग सोहळ्यात सर्व जाती धर्म,पंथ व संप्रदायाचे पुरुष -महिला मोठ्या आनंदाने सहभागी होतात व हे ‘,विश्वची माझे घर‘असे दर्शन घडवितात.ज्ञानदेवापासून वारकरी संप्रदायाला आरंभ झाला व संत तुकाराम महाराज यांनी त्यावर कळस रचला आहे.

शुद्ध मनाने परमेश्वराचे नामस्मरण व चिंतन करून काया-वाचा-मन भगवंताला अर्पण करणे हेच भागवत धर्माचे सार आहे.

अशा या आषाढी एकादशी दिनी स्वच्छ, निमर्ळ,व शुद्ध मनांची माणसे एकत्र येऊन विठ्ठलाशी एकरूप होतात व विठ्ठलाला भरपूर पाऊस दे, रोग राई दूर कर,शांती व बंधुभाव नांदू दे,जगावरचे संकट दूर कर असे साकडे टाकून प्रार्थना करतात. गाओ गावच्या पालख्या, वारकरी, भक्त -भाविकांचा अथांग जनसागर विठ्ठलाच्या दरबारी जमतो हा सर्वांग सुंदर मेळावा विठ्ठलाला निश्चितच मोहित करतो.विठ्ठल-पांडुरंग ही भक्तांच्या या अलोट गर्दीने व त्यांच्यातील ओढीने भक्तांच्या ईच्छा-आकांक्षा पूर्ण करतो असे मानतात.असा हा आषाढी एकादशीचा उत्सव म्हणजे सर्वांग सुंदर सत्संग सोहळाच होय.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# ‘ जय जय रामकृष्ण हरी ’च्या गजरात पिंपळे सौदागरची नगर वारी विठ्ठलमय

पुणे दि. २५ (प्रतिनिधी) – मराठीतील सुप्रसिद्ध बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांच्या श्रावणसरी या कवितेतील ‘ क्षणात येती सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे ‘ या ओळींचा प्रत्यय देणारे चैतन्यदायी वातावरण, पांढऱ्या शुभ्र अश्वावर आरुढ झालेले भालदार, चोपदार, फुलांनी सुशोभित केलेल्या तसेच खिल्लारी बैलांच्या बैलगाडीत विठ्ठल - रुखमाईच्या वेशभुषेत नटूनथटून आलेले बालकलावंत, टाळ - मृदंगाच्या तालावर मुखाने ‘ जय जय रामकृष्ण हरी ‘ चा गजर करणारे वारकरी, पारंपरिक वेशातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि शालेय विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या ‘ पिंपळे सौदागर नगर वारी ‘ ने अवघा परिसर विठ्ठलमय झाला. आषाढी एकादशी निमित्त सकल पिंपळे सौदागर नगरच्या वतीने शनिवारी सकाळी वारीचे आयोजन करण्यात आले होते.



उन - पावसाच्या आल्हाददायी वातावरणात उन्नती सोशल फाउंडेशन आणि पी के स्कुलच्या प्रांगणातून विठ्ठल भक्तांच्या उत्फुर्त प्रतिसादात निघालेली ही वारी कुंजीर चौक, बाळासाहेब कुंजीर मैदान, गोविंद गार्डन, इंडियन ऑईल पेट्रोल पंप , मुंजोबा महाराज मंदिर ते विठ्ठल मंदिर या मार्गाने गेली. हरिनामाच्या गजरात निघालेल्या या वारीमध्ये विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, केशव शंखनाद पथक, टॅलेंट फोर नेशन, उन्नती सखी मंच, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशन, श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्था, पिंपळे सौदागर ज्येष्ठ नागरिक संघ, मोदी ३.० ॲक्टिव्हिटी, वृंदावन ग्रुप या काही प्रमुख संस्थांचे पदाधिकारी, सदस्य तसेच पी के स्कुल आणि चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संचालक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने सामील झाले होते. वारी समितीचे अध्यक्ष प्रकाश झिंजुर्डे, उपाध्यक्षा प्रणिता अवधूत तसेच पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, नगरसेविका अनिता काटे, पवना बँकेचे संचालक जयनाथ काटे, उद्योजक संदिप काटे, पिंपरी चिंचवड कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे, मनोज ब्राह्मणकर, अनय मुळे, संकेत कुटे, संदेश काटे, अक्षय वडनेरकर, अमित वडनेरकर, मिलिंद पाटील, सागर बिरारी, बाळानाना काटे आदिंच्या प्रमुख उपस्थितीत निघालेल्या या वारीची सांगता विठ्ठल मंदिर येथे श्री विठ्ठलमाऊली आणि संत तुकाराम महाराजांच्या महाआरतीने करण्यात आली. वारीमध्ये सहभागी झालेल्यांना शेवटी प्रसादाचे वाटप करण्यात आले.



# वैजापूरातील एकटा विठोबा मंदिरात पहाटेपासून दर्शनासाठी भक्तांच्या रांगा

वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - पैठणचे संत श्रेष्ठ एकनाथ महाराजांचा साखरपुडा वैजापूरातील देशपांडे परिवारातील गिरजाबाई देशपांडे यांच्या सोबत ज्या एकट्या विठोबा मंदिरातिल ओट्यावर झाला ते महाराणा प्रतापसिंह रस्त्यावरील एकटा विठोबा मंदिरात सकाळ सहा वाजल्यापासून भक्त भविकांनी शनिवार (ता,२५)रोजी मोठी गर्दी केली.

या मंदिरात एकटा विठोबाची भव्य दिव्य मूर्ती आहे.या विठोबाची पूजा आरती आ. प्रा.रमेश पा.बोरनारे, तसेच नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी व त्यांच्या पत्नी शिल्पताई दिनेश परदेशी यांनी केली या प्रसंगी शांतीलाल संचेती, नगरसेवक स्वप्नील जेजुरकर, रवींद्र जेजुरकर, दिनेश वैष्णव, धोंडीराम सिंह राजपूत, गोकुळ भुजबळ, सचिन राजपूत तसेच मुंजोबा मित्र मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. भक्त भाविकांना प्रसाद वाटप सातत्याने चालू होते. लाडवाणी गल्लीतील विठ्ठल-रुख्मिनी मंदिरात ही पूजा व आरती पहाटेच करण्यात आली. या ठिकाणी डॉ. दिनेश परदेशी व शिल्पा परदेशी, धोंडीराम ठाकूर याची उपस्थिती होती. माजी नगरसेवक रामदास टेके, मुकुंद दाभाडे, विलास रमैय्या यांनी भक्त भाविकांना प्रसाद वाटप केले. पाटील गल्लीतील विठ्ठल-रुख्मिनी मंदिरात ही पहाटेच पूजा करण्यात आली व श्री.मारोती मंदिर विश्वस्तच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आले, या ठिकाणी ट्रस्ट अध्यक्ष उत्तमराव साळुंके, सदस्य मधुकर साळुंके, सोन्याबापू गावडे,पोपट भोसले, धोंडीराम राजपूत, शिवाजी शेटे, यांनी भक्त भाविकांना प्रसाद वाटप केला. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांची याप्रसंगी एकटा विठोबा मंदिरात दिंडी ही काढण्यात आली.

# राजीव गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वच्छता अभियान उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. या अभियानात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदानातून स्वच्छतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला.

महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वच्छता करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी झाडू, टिकाव, फावडे आदी साहित्य हातात घेऊन परिसर स्वच्छ केला. श्रमदानातून स्वच्छ परिसर, निरोगी समाज आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा संदेश देत राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याने समाजोपयोगी कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट, श्रमसंस्कार आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सह कार्यक्रम अधिकारी डॉ. कालिदास दिनकर फड यांनी स्वच्छता ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. या उपक्रमात डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. मनोज देवकर, डॉ. नानासाहेब लावंड, प्रा. प्रशांत माठे, डॉ. इम्रान पठाण, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा. शिंदे, प्रा. कोठाळे, डॉ. ललित गोल्डे, ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभियानाच्या शेवटी उपस्थितांनी महाविद्यालय परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची प्रतिष्ठा, स्वच्छतेची सवय आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ झाली.

# आषाढी एकादशीला येथील जाएन्ट्स ग्रुप ऑफ वैजापूर सहेलीने दिला भक्तांना प्रसाद




वैजापूर, दि. २५ (प्रतिनिधी) - येथील जाएन्ट्स ग्रुप ऑफ वैजापूर सहेलीने आषाढी एकादशी दिनी शनिवार(ता,२५)रोजी लाडवाणी गल्लीतील श्री.विठ्ठल -रुख्मिनी मंदिरात भक्त भाविकांना फराळ रुपी महाप्रसाद प्रदान करून सामाजिक बांधिलकी जपली.अध्यक्षा श्रीमती दाभाडे, श्रीमती मांजरे,श्रीमती रमैय्या यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नाशिकच्या हक्काच्या पाण्यावर तडजोड नाही; जायकवाडीच्या विसर्गावर आमदार देवयानी फरांदे संतप्त

नाशिक, दि. २५ (प्रतिनिधी) - नाशिकमधून जायकवाडी धरणाकडे नेमके किती पाणी सोडण्यात आले? जून महिन्यात जायकवाडीतील पाणीसाठा किती होता? आणि या विसर्गावर नियंत्रण नेमके कोणाचे आहे? अशा प्रश्नांची सरबत्ती करत आमदार देवयानी फरांदे यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. नाशिककरांच्या हक्काच्या पाण्याबाबत माहिती लपवली जात असल्याचा आरोप करत, यापुढे कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

अधिकृत आकडेवारी न मिळाल्याने संतप्त जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून तब्बल ९४ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. हे पाणी जायकवाडी धरणात प्रत्यक्षात किती पोहोचले, याची अधिकृत आकडेवारी मागितल्यानंतर प्रशासनाकडे त्याची माहितीच उपलब्ध नसल्याचे समोर आले. यावर संतप्त होत आमदार देवयानी फरांदे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला. नाशिकमधून सोडल्या जाणाऱ्या पाण्याचा हिशेबच नसणे ही गंभीर बाब असून, अधिकारी आकडेवारी लपवत असल्याचा आरोप त्यांनी केला. जायकवाडी धरणात सध्या अवघा ३१ टक्के पाणीसाठा आहे. त्यातील २४ टक्के मृतसाठा वजा केल्यानंतर उपयुक्त पाणीसाठा अत्यल्प राहतो. अशा परिस्थितीत मृतसाठ्याचा नियमबाह्य वापर झाला आहे का, याची चौकशी करण्याची मागणी फरांदे यांनी केली. नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचीही त्यांनीनाशिकच्या हक्काच्या पाण्यावर तडजोड नाही

समन्यायी पाणीवाटप कायद्याची अंमलबजावणी केवळ नाशिकवरच का केली जाते, असा सवाल उपस्थित करत त्यांनी मराठवाड्यात बारमाही शेती सुरू असताना नाशिकच्या शेतकऱ्यांना पाण्याअभावी तिमाही शेती करावी लागणे अन्यायकारक असल्याचे सांगितले. द्राक्षबागा आणि शेतीचे मोठे नुकसान होत असताना नाशिकच्या हक्काच्या पाण्याशी कोणतीही तडजोड होऊ देणार नसल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. यावेळी गोदावरी पाटबंधारे विभागाचे मुख्य कार्यालय संभाजीनगरऐवजी नाशिकमध्ये हलविण्याच्या मागणीचाही त्यांनी पुनरुच्चार केला. बैठकीला महापौर हिमगौरी आहेर-आडके, आमदार राहुल ढिकले, उपमहापौर विलास शिंदे, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, अतिरिक्त आयुक्त अमित रंजन यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# शासनाची युवकांबाबत संयम, सामंजस्यची भूमिका हवी

आजचे युवक उद्याचे या देशाचे खरे आधारस्तंभ व सूत्रधार असणार आहेत. ज्या देशाचे युवक उच्च विद्याविभूषित, कर्तृत्वसम्पन्न, व कार्यकुशल तसेच उद्यमशील असतात त्या देशाचे भवितव्य अत्यंत उज्वल व उन्नतीशील असते. सध्या देशातील युवक अस्थिर व मन विचलित असलेला आहे. आज युवक मोठ्या प्रमाणात बेकार आहेत. उच्च शिक्षण घेऊनही ते स्वतःच्या पायावर उभे नाहीत त्यामुळेही तरुण वर्ग बिथरलेला आहे. अशा मनस्थितीत आजचा युवक हा वेगळ्या मार्गावर जाऊन आपल्या मनातील खद- खद कोणत्याही मार्गाने व्यक्त करण्यास सदैव तयार आहे.अशा अस्थिर व मन स्थिती चलबिचल असलेल्या या युवा शक्तीचा गैर फायदा घेणारे अनेक जन टपलेले आहेत. त्यांच्या अस्थिर मनाचा लाभ आपल्याला मिळावा म्हणून ही काही शक्ती उतावीळ आहेत. अशाने ही युवा शक्ती विनाकारण विघातक कार्यात गुंतेल व त्यांचे भवितव्य अंधारमय होऊन बसेल. एकदा ही देशातील युवा शक्ती विघातक मार्ग किंवा वाममार्गाला गेली तर त्यांना नियंत्रणात आणणे खुप अवघड व जिकिरीचे बनेल.

यासाठी शासनाने जर या युवा शक्तीला व त्यांच्या मागण्या व समस्यांना समजून घेण्यासाठी त्यांच्या सोबत संवाद साधला तर ही युवा शक्ती शासनाच्याच मागे खंबीरपणे उभे राहिल या बाबत दुमत असू शकत नाही.या युवा शक्तीशी संवाद साधून नंतर शासन आपल्या भूमिकेवर ठाम जरी राहिले तरी चालेलं पण शासनाने या युवा शक्तीशी संयम व सामंजस्याच्या मार्गाने संवाद साधने काळाची गरज आहे- आज देश अत्यंत भयानक स्थितीतून जात आहे.

देशासमोर अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत, देशाला स्वावलंबी बनविणे काळाची गरज आहे, बेकारी, कर्ज, शेतकरी समस्या, महिला सशक्तीकरण, इंधन समस्या, सीमेवरचे वाद, अतिरेकी समस्या अशा कितीतरी समस्या आहेत त्यात युवा वर्ग जर काही बाबी साठी अडून बसत असेल तर त्यावर अतिरिक्त वेळ व शक्ती खर्च होईल व देशाच्या वरील समस्या कडे दुर्लक्ष होईल म्हणून युवा शक्तीनेही काही बाबी बाबत अडून बसू नये व शासनाने ही संयम व सामंजस्य राखून युवा शक्तीशी संवाद साधावा व उदभवलेल्या स्थिती- तून मार्ग काढावा.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# पाटील गल्लीतील विठ्ठल रुख्मिनी मंदिरात पूजा



**वैजापूर - पाटील गल्लीतील विठ्ठल- रुख्मिनी मंदिरात मधुकर साळुंके ,पोपट धुपाजी भोसले व ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी विठ्ठल-रुख्मिनी मूर्तीला पुष्पहार टाकून दर्शन घेतले.**

# एच-१बी व्हिसावरील १ लाख डॉलर शुल्कासंदर्भात अमेरिकेच्या न्यायालयाचा डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का

वॉशिंग्टन, दि. २५ (वृत्तसंस्था) - अमेरिकेच्या इमिग्रेशन आणि रोजगार धोरणांबाबतीत एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिकेच्या न्यायालयाकडून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का बसला असून, यामुळे हजारो भारतीय व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. एच-१बी (क-१इ) व्हिसावर आकारण्यात आलेल्या १,००,००० डॉलर्सच्या (सुमारे ८३ लाख रुपये) प्रचंड शुल्काला स्थगिती देण्याची ट्रम्प प्रशासनाची मागणी फेडरल अपील न्यायालयाने फेटाळून लावली आहे. या न्यायालयाच्या निर्णयामुळे उच्च-कुशल परदेशी कामगारांचा मार्ग सुकर झाला आहे.

फर्स्ट सर्किट कोर्ट ऑफ अपील्सचा निर्णय - बॉस्टनस्थित फर्स्ट सर्किट कोर्ट ऑफ अपील्सच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने, अमेरिकी जिल्हा न्यायाधीश लिओ टी. सोरोकिन यांच्या ८ जूनच्या निर्णयावर स्थगिती आणण्याची मागणी करणारी सरकारची याचिका फेटाळून लावली आहे. यापूर्वी, जिल्हा न्यायाधीश लिओ टी. सोरोकिन यांनी काँग्रेसच्या मंजुरीशिवाय लादलेला हा एक 'बेकायदेशीर कर' असल्याचे स्पष्ट करत हे शुल्क रद्दबातल ठरवले होते. त्यानंतर, हा निर्णय लागू करण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने फेडरल अपील न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सरकारची ही याचिका फेटाळली. न्यायालयाने आपल्या निकालपत्रात स्पष्ट केले की, कार्यकारी मंडळाने (सरकारने) असा कोणताही आर्थिक भार किंवा कर लादण्यापूर्वी काँग्रेसने त्यांना तसा स्पष्ट अधिकार दिला आहे, हे सिद्ध करणे बंधनकारक असते. परंतु, या प्रकरणात ट्रम्प प्रशासन ती अनिवार्य अट स्पष्ट करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. तसेच, या निर्णयाला स्थगिती न मिळाल्यामुळे फिर्यादी राज्यांचे कोणतेही गंभीर नुकसान होणार नाही, असेही न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

**एच-१बी व्हिसा म्हणजे काय आणि त्याचे महत्त्व?**

अमेरिकेद्वारे जारी केला जाणारा एच-१बी व्हिसा हा एक नॉन-इमिग्रंट व्हिसा आहे. या माध्यमातून अमेरिकन कंपन्यांना विशिष्ट क्षेत्रात सैद्धांतिक किंवा उच्च तांत्रिक कौशल्य असलेल्या परदेशी व्यावसायिकांना नोकरीवर ठेवण्याची अधिकृत परवानगी मिळते. अमेरिकन न्यायालयच्या या निर्णयामुळे भारतीय व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण, अमेरिकेद्वारे जारी केल्या जाणाऱ्या एच-१बी व्हिसाचे सर्वात मोठे लाभार्थी भारतीय आहेत.

# फ्यूजन क्लासरूम एड्युटेक लिमिटेडचा आयपीओ शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी खुलणार; प्रति इक्विटी शेअर (दर्शनी मूल्य रू. १०) किंमत पट्टा रू. १५१ ते रू. १५९ निश्चित

फ्यूजन क्लासरूम एड्युटेक लिमिटेड ('कंपनी'), ही भारतातील वेगाने विकसित होत असलेल्या हायब्रिड एडटेक प्लॅटफॉर्मपैकी एक असून घ-१२ शिक्षण, स्पर्धा परीक्षांची तयारी, व्यावसायिक कौशल्यवृद्धी (Professional Upskilling) तसेच AI/ML शिक्षण उपाय (Learning Solutions) प्रदान करते. कंपनीने आपल्या प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री प्रस्ताव (IPO)ची घोषणा केली आहे. हा आयपीओ शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी खुला होईल आणि मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होईल. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली/इश्यू कालावधी गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी सुरू होईल, जो आयपीओ खुलण्याच्या एक कामकाजाच्या दिवस आधी असेल.

या प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री प्रस्तावामध्ये १९,८९,४०० पर्यंतच्या नवीन (Fresh Issue) इक्विटी शेअर्सचा तसेच ४,६५,८०० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेल (Offer for Sale - OFS)चा समावेश आहे.

अशा प्रकारे, प्रत्येकी %१० दर्शनी मूल्याचे एकूण २४,५५,२०० इक्विटी शेअर्स या इश्यूद्वारे ऑफर करण्यात येणार आहेत. प्राइस बँड, किमान बोली आकार (Minimum Bid Lot) आणि इश्यूचा अंतिम आकार, सेबी (SEBI)च्या नियमांनुसार इश्यू खुलण्यापूर्वी जाहीर करण्यात येईल.

**- ठळक मुद्दे -**

- २४,५५,२०० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचा प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री प्रस्ताव (खझज).
- प्रति इक्विटी शेअर किंमत पट्टा रू१५१ ते रू १५९.
- किमान बोली आकार (Bid Lot) १,६०० इक्विटी शेअर्स असून त्यानंतर ८०० इक्विटी शेअर्सच्या पटीत अर्ज करता येईल.
- अँकर गुंतवणूकदारांसाठी इश्यू ३० जुलै २०२६ रोजी खुला होईल.
- इश्यू ३१ जुलै २०२६ रोजी खुला होईल आणि ४ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होईल.
- फ्लोअर प्राइस हा इक्विटी शेअरच्या दर्शनी मूल्याच्या १५.१० पट असून, कॅप प्राइस हा दर्शनी मूल्याच्या १५.९० पट आहे.

# समाजोपयोगी कार्यातून आषाढी एकादशी साजरी

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी) - आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शहरासह जिल्हाभरातील विविध सामाजिक संस्था, संघटना आणि स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) वतीने भक्तीमय वातावरणात विविध सेवा व जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाच्या सेवेला प्राधान्य देत अनेक संस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी कार्यातून आषाढी एकादशी साजरी केली.

यावेळी महाप्रसादाचे वाटप, अन्नदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, फळांचे वितरण, आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, भजन-कीर्तन, हरिपाठ आणि दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले. अनेक ठिकाणी वारकरी आणि भाविकांचे पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.

सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजसेवा, मानवता आणि समतेचा संदेश देणारा दिवस आहे. गरजू, निराधार आणि वारकऱ्यांच्या सेवेतून संतांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. शहरातील अनेक मंदिर परिसर, प्रमुख चौक आणि सार्वजनिक ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विठ्ठल-रुक्मिणीच्या नामस्मरणाने परिसर भक्तिमय झाला होता. विविध स्वयंसेवकांनी वाहतूक नियोजन, स्वच्छता आणि भाविकांना मदत करण्याची जबाबदारी पार पाडली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित या सेवा उपक्रमांमुळे समाजात सेवाभाव, एकात्मता आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# बँक ऑफ इंडियाचा आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीतील निव्वळ नफा ३६.२३ टक्क्यांनी वाढून ३,०६८ कोटी रुपयांवर

मुंबई, २४ जुलै २०२६: बँक ऑफ इंडियाने ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे आर्थिक निकाल जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत बँकेचा निव्वळ नफा ३६.२३ टक्क्यांनी वाढून ३,०६८ कोटी रुपये झाला. 'रिटर्न ऑन ॲसेट्स' (मालमत्तेवरील परतावा) आणि 'रिटर्न ऑन इक्विटी' (भांडवलावरील परतावा) अनुक्रमे १.०१% आणि १६.१२% पर्यंत सुधारले.

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत बँकेचा परिचालन नफा (ऑपरेटिंग प्रॉफिट) २५.९९ टक्क्यांच्या वाढीसह ५,०५१ कोटी रुपयांवर पोहोचला.

बँकेच्या जागतिक व्यवसाय मिश्रणात (G$lobal Business Mix) वार्षिक आधारावर १६.५७% वाढ झाली असून, ते जून २०२५ मधील रू.१५,०६,१४२ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.१७,५५,६९९ कोटींवर पोहोचले आहे. जागतिक ठेवींमध्ये (Global Deposits) १४.९०% वाढ होऊन त्या जून २०२५ मधील रू.८,३३,६९८ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.९,५७,९२४ कोटींवर पोहोचल्या आहेत. जागतिक कर्जांमध्ये (Global Advances) १८.६४% वाढ होऊन ती जून २०२५ मधील रू.६,७२,४४४ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.७,९७,७७५ कोटींवर पोहोचली आहेत. जून २०२६ मध्ये परदेशातील ठेवींमध्ये ७.७३% वाढ होऊन त्या रू.१,३२,९६१ कोटींवर, तर परदेशातील कर्जांमध्ये १५.६७% वाढ होऊन ती रू.१,२३,९४२ कोटींवर पोहोचली आहेत.

देशांतर्गत ठेवींमध्ये (Domestic Deposits) वार्षिक आधारावर १६.१५% वाढ होऊन त्या जून २०२५ मधील रू.७,१०,२७७ कोटीं वरून जून २०२६ मध्ये रू.८,२४,९६३ कोटींवर पोहोचल्या. देशांतर्गत 'कासा' (CASA) ठेवी जून २०२५ मधील रू. २,८१,८४६ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू. ३,०२,०८५ कोटींपर्यंत वाढल्या आणि 'कासा' प्रमाण (CASA ratio) ३६.६८% इतके राहिले. देशांतर्गत कर्जांमध्ये (Domestic Advances) वार्षिक आधारावर १९.२०% वाढ होऊन ती जून २०२५ मधील रू. ५,६५,२९७ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू. ६,७३,८३३ कोटींवर पोहोचली.

RAM कर्जांमध्ये (RAM Advances) वार्षिक आधारावर १९.७५% ची वाढ होऊन ती जून २०२५ मधील रू.३,२८,०४८ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.३,९२,८३३ कोटींवर पोहोचली; जून २०२६ मध्ये देशांतर्गत एकूण कर्जांमध्ये (Gross Advances) यांचा वाटा ५८.३०% इतका होता. किरकोळ कर्जपुरवठ्यात (Retail Credit) वार्षिक २०.६०% वाढ होऊन तो जून २०२५ मधील रू.१,३७,७८२ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.१,६६,१७० कोटींवर पोहोचला. चडचए कर्जांमध्ये वार्षिक १९.३४% वाढ होऊन ती जून २०२५ मधील रू.९२,९०८ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.१,१०,८८१ कोटींवर पोहोचली. कृषी कर्जपुरवठ्यात वार्षिक १८.९२% वाढ होऊन तो जून २०२५ मधील रू.९७,३५८ कोटींवरून जून २०२६ मध्ये रू.१,१५,७८२ कोटींवर पोहोचला.

बँकेचे 'ग्रॉस एनपीए' (Gross NPA) १११ बेसिस पॉइंट्सने सुधारून जून २०२५ मधील २.९२% वरून जून २०२६ मध्ये १.८१% झाले. 'नेट एनपीए' (Net NPA) प्रमाण २४ बेसिस पॉइंट्सने सुधारून जून २०२५ मधील ०.७५% वरून जून २०२६ मध्ये ०.५१% झाले.

बँकेच्या तिमाही 'स्लिपेज रेशो'मध्ये (slpipage ratio) वार्षिक आधारावर ९ बीपीएसची सुधारणा होऊन तो ०.२४% झाला.

बँकेचा 'क्रेडिट कॉस्ट' (Credit Cost) आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीतील ०.१७ वरून आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीत ०.१५ पर्यंत सुधारला.

३० जून २०२६ रोजी बँकेचे 'कॅपिटल ॲडेक्सी रेशो' (CRAR) १८.६९% इतके आहे.

बँकेच्या एकूण डिजिटल व्यवहारांच्या संख्येत वार्षिक आधारावर २२% वाढ झाली; ही संख्या जून २०२५ मधील १.७० अब्जवरून जून २०२६ मध्ये २.०८ अब्ज झाली.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# प्रतिपंढरपूरात विठ्ठल नामाच्या गजरात आषाढी एकादशी उत्साहात





छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त प्रति पंढरपुर समजले जाणारे वाळुज पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी बघायला मिळाली. यावेळी विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला असून संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. पहाटेच्या काकड आरतीनंतर मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी खुले केल्यानंतर दर्शनासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह हजारो भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावल्याचे बघायला मिळाले. विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत भाविकांनी सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

मध्यरात्री उद्योगमंत्री उदय सामंत, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, खा. संदिपान भुमरे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी मंदिराचे अध्यक्ष राजेंद्र पवार, सचिव आप्पासाहेब झळके, विश्वस्त रत्नाकर शिंदे, हरीश साबळे, कृष्णा झळके, हरिभाऊ शेळके, बंकटलाल जैस्वाल, काकापाटील फांदाडे यांच्यासह आदींनी सहकार्य केले.

विविध भागांतून आलेल्या वारकरी दिंड्यांनी मंदिरात प्रवेश करत टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग आणि हरिपाठ सादर केला. वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसराला पंढरपूरच्या वारीचे स्वरूप प्राप्त झाले. जय हरी विठ्ठलच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांमुळे मंदिर परिसर फुलून गेला होता. भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी आलेल्या भाविकांनी आषाढी एकादशीचा हा सोहळा अविस्मरणीय ठरला, अशा भावना व्यक्त केल्या.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने दर्शनासाठी विशेष नियोजन केले होते. दर्शन रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी मंदिर परिसरात ६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण परिसरावर सतत नजर ठेवण्यात आले. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस प्रशासनानेही विशेष बंदोबस्त ठेवला होता. वाहतूक नियंत्रण, दर्शन रांगांचे नियोजन करण्यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले. भाविकांनीही प्रशासनाला सहकार्य करत शांततेत दर्शनाचा लाभ घेतला.

आषाढी एकादशीनिमित्त शहरासह जिल्ह्यात विठ्ठल भक्तीचा उत्साह ओसंडून वाहताना दिसून आला. शहरातील विविध विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये पहाटेपासून काकड आरती, हरिपाठ, भजन, कीर्तन, नामस्मरण आणि महापूजा अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## आषाढी एकादशी निमित्त राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठातर्फे भव्य सेवा उपक्रम



छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त भाजप राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने अमरप्रीत हॉटेलसमोर श्री विठ्ठल भगवान यांच्या १२ फूट उंच भव्य मूर्तीची स्थापना, आकर्षक देखावा तसेच भाविकांसाठी खिचडी, केळी व राजगिरा लाडू वाटपाचा भव्य सेवा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी हजारो भाविकांनी श्री विठ्ठल भगवान व पवित्र पादुकांचे दर्शन घेतले. उपस्थित सर्व भाविकांना तुळशीपत्रयुक्त तीर्थाचे वितरण करण्यात आले. सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल भगवानांची भव्य महाआरती संपन्न झाली.

या कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगरचे खासदार श्री संदीपानजी भूमरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड, आमदार श्री प्रदीपजी जैसवाल, श्री संजयजी केनेकर, महापौर श्री समीरजी राजूरकर, महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९ व २० चे नगरसेवक, तसेच राजस्थानी समाजातील विविध संस्थांचे अध्यक्ष, समाजातील ज्येष्ठ नागरिक, प्रकोष्ठाचे मार्गदर्शक आणि अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आषाढी एकादशी निमित्त छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी सुमारे ७ क्विंटल खिचडी, ४,००० केळी तसेच राजगिरा लाडूंचे प्रसादरूपाने वितरण करण्यात आले. या सेवा उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प प्रमुख जयप्रकाश खंडेलवाल, दीपक फुलभाती, मेघना विजयवर्गीय आणि मोनिका अग्रवाल यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच राजस्थान प्रकोष्ठ व महिला प्रकोष्ठाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य यांनी नियोजन, व्यवस्थापन आणि सेवाकार्यात मोलाचे योगदान देऊन हा उपक्रम यशस्वी केला.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

# जिल्ह्यातील १,२७६ गावांमधील एकूण ९९ हजार ६४८ पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

**आधार प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन, लाभार्थी संख्येत आणखी वाढ होणार**

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६'' अंतर्गत जिल्ह्यातील १,२७६ गावांमधील एकूण ९९ हजार ६४८ पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध केली आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी दिली आहे.

पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची व अग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहनही श्री. जाधव केले आहे.

या योजनेस मंजुरी मिळाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १,२७६ गावांमधील एकूण ९९ हजार ६४८ पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा' किंवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक व बंधनकारक आहे. त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपले नाव लाभार्थी यादीत असल्याची खात्री करून अंगठ्याचे प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे.

जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी शेतकऱ्यांना विलंब न करता आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगितले आहे.

दरम्यान, राज्यातील ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६'' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ देण्यात येत असून, आधार संलग्नीकरण आणि प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करणे ही लाभ मिळविण्याची महत्त्वाची अट असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातही ही प्रक्रिया अजून सुरु असून लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल, असेही श्री. जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

# ''स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी'' उपक्रम उत्साहात संपन्न

**बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर मार्गावर महानगरपालिकेची स्वच्छता दिंडी; २०० हून अधिक सफाई कर्मचारी, आयसीटी टीम आणि घंटागाड्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश**

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या निमित्ताने छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांची सेवा करत स्वच्छतेचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे आयोजित ''स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी'' हा अभिनव उपक्रम आज मोठ्या उत्साहात पार पडला.

महावीर चौक येथून सकाळी १० वाजता महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते स्वच्छता दिंडीला प्रारंभ झाला. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये,विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, शहर सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, नगरसेवक शिवाजी दांडगे, नगरसेविका सीमा साळवे, आयुक्त अमोल येडगे, उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन नंदकिशोर भोंबे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येत दिंडीच्या मार्गाची स्वच्छतेत सहभाग नोंदविला.



दिंडीत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे २०० हून अधिक स्वच्छता कर्मचारी, आयसीटी टीम तसेच १० हून अधिक घंटागाड्यांचा सहभाग होता. झाडू, फावडे आणि स्वच्छतेची साधने हातात घेऊन कर्मचाऱ्यांनी बाबा पेट्रोल पंप ते छोटे पंढरपूर या मार्गावर स्वच्छता करत वारकऱ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला. मार्गावरील कचरा संकलन, जनजागृती आणि वारकऱ्यांना आवश्यक ती मदत यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिका आणि इतर सहाय्यक यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

आपले मनोगत व्यक्त करताना महापौर समीर राजूरकर म्हणाले, ''आयुक्त अमोल येडगे यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेने स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी हा अत्यंत आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविला आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग, सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. हा उपक्रम पुढील अनेक वर्षे सातत्याने सुरू राहावा, अशी अपेक्षा आहे. विठुरायाच्या भक्तांची सेवा करण्याची संधी आम्हाला लाभली, यासाठी मी विठुरायाच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.''

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये म्हणाले, ''आषाढी एकादशीच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो वारकरी पायी चालत येतात. त्यांच्या सेवेसाठी आणि स्वच्छतेसाठी महानगरपालिकेने केलेले नियोजन अत्यंत कौतुकास्पद आहे. शहरातून लाखो भाविक मार्गक्रमण करतात. त्यांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.''

आयुक्त अमोल येडगे म्हणाले, ''आषाढी एकादशीच्या निमित्ताने छोट्या पंढरपूरकडे जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याची सेवा करण्याची ही महानगरपालिकेला लाभलेली मोठी संधी आहे. यंदा प्रथमच सफाई कर्मचाऱ्यांसोबत आयसीटी टीमही या सेवाकार्यात सहभागी झाली आहे. स्वच्छतेचा संदेश प्रत्येक वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे.

रुग्णवाहिका, अधिकारी आणि कर्मचारी सतत संपर्कात राहून वारकऱ्यांना मदत करतील. विठुरायाच्या भक्तांची सेवा करताना ही आषाढी एकादशी सर्वांच्या कायम स्मरणात राहील, अशा समर्पित भावनेने सर्वांनी काम करावे.''

(पान १ वरून)

## कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन मागे;....

मागे घेण्याची मागणी सीजेपीने केली होती. सरकारने ही मागणी मान्य केली आहे. एफआयआरच्या कॉपी सीजेपीला देण्यासही सरकारने तयारी दर्शवली आहे. शिवाय भविष्यात देखील कारवाई केली जाणार नाही, असे सरकारने आश्वस्त केले आहे, अशी माहिती सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिले. तसेच, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरभाई देण्याचे मान्य केल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी नुकसान भरभाई देण्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली होती. याबाबत बोलताना दास यांनी सांगितले की, नुकसान भरपाई देण्यास सरकार तयार आहे.

यासाठी शासकीय नियमांनुसार भरपाई दिली जाईल, असे सरकारने सांगितले आहे. तसेच, सीजेपीकडून शिक्षण व्यवस्था आणि परीक्षा सुधारणांवर चर्चेची मागणी करण्यात आली असून, सरकार यासाठी देखील सकारात्मक असल्याचे रांका यांनी सांगितले.

## त्यांनी वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रीय हिताला..

शाळांचा उपक्रम, आयआयटींचा विस्तार आणि प्रवेश परीक्षांचा १९ भाषांपर्यंत विस्तार यांसारख्या अनेक सुधारणा त्यांनी अंमलात आणल्या. व्यापक जनहिताप्रती आपली वचनबद्धता दर्शवत त्यांनी आज (२५ जुलै) राजीनामा सादर केला. त्यांनी (धर्मेंद्र प्रधान) वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य दिलं, हेच एका खऱ्या भाजपा कार्यकर्त्याचं वैशिष्ट्य आहे. संपूर्ण भाजपा परिवार त्यांच्या पाठीशी उभा आहे'', अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## देशातली ९५% जनता मोदी सरकारच्या विरोधात;...

मार्गाने या सत्तेला उत्तर देईल. जनतेचा कौल हा कोणत्याही आयटी सेलपेक्षा मोठा असतो, असा टोलाही त्यांनी लगावला.

वडेट्टीवार म्हणाले की, मोहन भागवत यांना आज पंतप्रधान नरेंद्र मोदींना सल्ला द्यावा वाटत आहे, यामागे देशातील तरुणांचा वाढता असंतोष दडलेला आहे. रोजगाराचा प्रश्न, पेपर लीकच्या घटना, भरती प्रक्रियेतील विलंब आणि भविष्याबाबतची असुरक्षितता यामुळे देशातील तरुणांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

ज्या तरुणांच्या विश्वासावर नरेंद्र मोदी सत्तेपर्यंत पोहोचले, त्याच तरुणांचा आज सरकारवरील विश्वास ढासळत आहे. तरुण रस्त्यावर उतरला आहे आणि आपल्या भविष्याचा हिशेब मागत आहे. सर्व काही हातातून निसटू लागल्यानंतरच सल्ल्याची आठवण होणे, हेच सरकारच्या अपयशाचे सर्वात मोठे प्रतीक आहे. देशातील तरुणांच्या प्रश्नांकडे वेळेत लक्ष दिले असते, तर आज अशी परिस्थिती निर्माण झाली नसती.

## देशातली युवाशक्ती जर एकत्र आली तर...

दिलेलं आहे. आता हे झाल्यानंतर याविषयी जे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याचं पुढे काय होणार? कारण या आंदोलनाच्या दरम्यान भाजप सरकारचा एक बीभत्स, भीषण, गुन्हेगारी प्रवृत्तीचा चेहरा हा संपूर्ण जगासमोर आलेला आहे. ज्या पद्धतीने तरुणांवरती लाठ्या चालवल्या गेल्या, ज्या पद्धतीने तिथे आलेल्या युवतींवरती हात उचलला गेला... आम्ही जेव्हा गेलो होतो तेव्हा एक ती युवती अत्यंत व्यथित होऊन, व्याकुळ होऊन सांगत होती की तिच्या कपड्याला सुद्धा हात घातला गेला अशी माहिती उद्धव ठाकरेंनी दिली.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आता या पोलिसांवरती कोण गुन्हे दाखल करणार? आणि साध्या वेषातले जे गुंड तिकडे घुसवले गेले होते, त्यांना शोधून त्यांच्यावरती कारवाई करणार की नाही? आणि एकूणच या विद्यार्थ्यांवरती जर कुठे गुन्हे दाखल केले गेले असतील, तर हे मागे घेणार आहेत की नाही, हे आता अमित शहांनी सांगितलं पाहिजे. कारण या पोलिसांवरती ज्यांनी दंडुकेशाही केली, या तरुणांवरती लाठ्या-काठ्या चालवल्या, त्यांच्यावरती जर का कारवाई होणार नसेल, तर मग कदाचित ही तरुणाई आता धर्मेंद्र प्रधानांकडून अमित शनांकडे त्यांचा मोर्चा वळवल्याशिवाय राहणार नाही.

## पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय ...

यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल.''

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ''यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो.''

''लाखो भक्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अनेक वारकरी कळसाच्या दर्शनावरच समाधान मानतात. जणू काही विठुरायाचीच भेट झाली आहे, अशा भावनेने लोक जातात. या अनोख्या सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणे, ही देखील एक पर्वणी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपला प्रतिनिधी म्हणून केलेली ही पूजा संपूर्ण महाराष्ट्रातील आणि जगभरातील पांडुरंगाच्या भक्तांच्या वतीने केलेली पूजा आहे,'' असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ''येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. विठुरायाची सेवा जरी आपल्याला करता आली नाही, तरी वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे, यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.''

प्रारंभी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक केले. ''श्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे,'' असे ते म्हणाले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि सौ. प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

## मनपा शाळा एन-सेवन सिडको शाळेत आषाढी एकादशी सण उत्साहात साजरा!



छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत आषाढी एकादशी सण साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणीची वेशभूषा परिधान केली होती. बाल वारकऱ्यांची पाचशे मीटर पायी दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री मनोज अग्रवाल यांनी केले. शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी भक्ती गीतावर समुह नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थ्यांनी भक्ती गीत गायन केले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी फुगड्या खेळल्या. शिक्षकांनी भक्ती गीत गायन केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आदरणीय श्रीमती वैशाली सुरडकर मॅडम यांनी केले.

कार्यक्रम कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका सौ. संगीता अंबेकर, सुनीता पाटील, वैशाली सुरडकर, मंगला महाजन, अंजली कुलकर्णी, स्वाती घोडतुरे, दीपाली औटे, शिल्पा बहुरे, वैशाली देशमुख, मंजुश्री राठोड, वेंकट जाधव, शुभांगी चव्हाण, दीपक पडोळ, संदिप कळंबे, सागर मगरे, ज्ञानेश्वर असोलकर, पल्लवी क्षीरसागर, प्रितीश सराटे, सुशील दांडगे, फिरदोस नदाफ, सबासदफ सिद्दीकी, पल्लवी क्षीरसागर, बोरसे, सदावर्ते, अंकिता बोचरे, श्रीमती आश्विनी घोडके, निशांत जडे या सर्व शिक्षक शिक्षिकांनी आणि रमेश देवडे, विजय गायकवाड, अविनाश भोंबे या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

## दामिनी पथकाकडून विद्यार्थ्यांना सुरक्षितता व जनजागृतीचे मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील दामिनी पथक-३ तर्फे शुक्रवारी (दि. २४) नूतन माध्यमिक मनपा शाळा, ज्युबिली पार्क येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम भरोसा सेलच्या पोलिस निरीक्षक सुनिता मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तुपेकर यांनी दामिनी पथकाचे स्वागत करून विद्यार्थ्यांना विविध सामाजिक व सुरक्षा विषयांवर मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

शाळेच्या प्रार्थनेनंतर सुमारे १५० ते २०० विद्यार्थ्यांना 'गुड टचबॅड टच', मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, मुलींनी छेडछाडीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी, व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, वाहतूक नियमांचे पालन, पोलीस प्रशासनाचे कार्य, तसेच बालविवाह प्रतिबंध व जनजागृती आदी महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल निर्मला निंभोरे, महिला पोलीस अंमलदार अनिता खैरे, महिला पोलीस अंमलदार अयोध्या दौंड तसेच पोलीस अंमलदार बाळू वणे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक तुपेकर, शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी दामिनी पथक व पोलीस प्रशासनाचे आभार मानले. कार्यक्रम शांततापूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.